ISSN

18-19
ISSN
वैराट



# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

A Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
SJIF Impact Factor : 6.21 ISSN : 2277-8721
Vol. VIII Special Issue – I, March 2019

# REFLECTION OF EDUCATION IN LITERATURE

# साहित्यातील शिक्षणाचे प्रतिबिंब

## ■ EDITORIAL BOARD ■

Prin. (Dr.) Arjun Rajage
Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

Dr. Girish More
Department of Marathi, Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

Dr. Uttam Patil
Department of English, Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

Mr. Shankar Dalavi
Department of Hindi
Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

Dr. S.B. Biradar
Department of English, SVM College, Ilkal (Karnataka)

Dr. Sabiha S. Sayyad
Department of Urdu, Night College of Arts and Science, Ichalkaranji

RAJARSHI SHAHU ARTS AND COMMERCE COLLEGE, RUKADI
Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur 416 118
E-mail: rajshahurkd@yahoo.com, Website: www.rajshasuruk.in

| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 70 | शिक्षण - साहित्य : अनुबंध आणि काही निरीक्षणे | डॉ. राजेंद्र जयराम खंदारे | 202 |
| 71 | शिक्षण व साहित्य परस्पर संबंध : एक अभ्यास | प्रा.डॉ.उन्मेष शेकडे | 205 |
| 72 | शिक्षणामुळे बदललेल्या कुटुंबातील 'आमचा बाप' चा जीवनसंघर्ष | प्रा.डॉ.आर.डी. कांबळे | 209 |
| 73 | संस्कृत साहित्यातील शिक्षणाचे प्रतिबिंब | प्रा. श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे | 212 |
| 74 | माझी काटेमुंढरीची शाळा ; शिक्षणाचे अधिक उण्या स्वरूपाचे एक चित्र | विपिन नारायण वैराट | 216 |
| 75 | वामन जाधव यांच्या कादंबरीतील शिक्षणाचे भयाण वास्तव | डॉ. हिराचंद रोहिदास मोरे | 220 |
| 76 | अशोक पवार यांच्या कादंब-यातील शिक्षण | संजय वारके | 223 |
| 77 | मराठी कवितेच्या शिक्षणातून रुजवलेली मानवी मूल्ये | प्रा.डॉ.आनंद वारके | 225 |
| 78 | योगीराज वाघमारे यांच्या कादंबऱ्यांतील शिक्षणाचे प्रतिबिंब | डॉ. सारीपुत्र तुपेरे | 229 |
| 79 | शिक्षक – विद्यार्थी नातेसंबंधाचा हृद्य आविष्कार – 'झेल्या' व 'चितळे मास्तर' | डॉ. रचना सचिन माने | 233 |
| 80 | कौटुंबिक नातेसंबंधांवर शिक्षणाचा झालेला परिणाम आणि मराठी साहित्य | सौ. विजयालक्ष्मी वि. देवगोजी | 235 |
| 81 | महात्मा फुले यांच्या साहित्यातील शिक्षण विषयक विचार | प्रा. बाळासो आ. सुतार | 237 |
| 82 | 'माझा बाप बल्लया' : शिक्षणासाठीचा संघर्ष | प्रा. प्रकाश नाईक | 241 |
| 83 | शिक्षण व्यवस्थेतील अनैतिकता भ्रष्टाचार शोषण : 'कोंडणातील जिणं' | डॉ. **डिगोळे बि.** व्ही. | 243 |
| 84 | 'भंगार' मधील शिक्षणाचा जागर | डॉ. लता पांडुरंग मोरे | 246 |
| 85 | मराठी साहित्यातील शिक्षणाचे चित्रण : विदारक तरीही स्वागतार्ह | डॉ. युवराज देवाळे | 248 |
| 86 | लोक माझे सांगाती'मधील शरद पवारांची शैक्षणिक भूमिका | मोतीराम पौळ | 251 |
| 87 | बनगरवाडी कादंबरीतील 'शिक्षण' | **डॉ. मारुती पांडूरंग डेळेकर** | 254 |
| 88 | आधुनिक मराठी साहित्यावरील शिक्षणाचा प्रभाव | प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे | 256 |
| 89 | **स्त्री शिक्षण चळवळीचा मराठी साहित्यावरील प्रभाव** | **निलम प्रदीप पाटील** | 260 |
| 90 | "फेसाटी" कादंबरीतील युवकाचा शिक्षणसंघर्ष | सुनील श्रीशैल बुद्धनावर | 265 |
| 91 | ''निशाणी डावा अंगठा'' मध्ये चित्रीत झालेला प्रशासन व्यवहार | डॉ. सुभाष गणपती जाधव | 270 |
| 92 | शिक्षणामुळे प्रभावित स्त्रीसुधारणा आणि मराठी साहित्य | डॉ. सविता सुनील केंजळे | 274 |
| 93 | ग्रामावकाशातील जनिच्या शिक्षणाची संघर्षमय करूण कहाणी : 'झिम् पोरी झिम्' | प्रा.लक्ष्मण व्यंकट बिराजदार | 277 |
| 94 | दलित आत्मकथनांतील शैक्षणिक संघर्ष | डॉ. सतीश कामत | 280 |
| 95 | 'तळ ढवळताना' या काव्यसंग्रहातील शिक्षणव्यवस्थेचे चित्रण | डॉ. अशोक नामदेव शिंदे | 283 |
| 96 | वाणीकिडे : शिक्षणव्यवस्थेतील अनैतिकता, भ्रष्टाचार आणि शोषण | शैला आनंदराव क्षीरसागर | 287 |
| 97 | 'परिस्थितीला दिवस जातात तेव्हा...' मधील शिक्षणाचे महत्त्व | डॉ. प्रमोद भीमराव गारोडे | 290 |
| 98 | 'जुबा' कादंबरीतील शिक्षक | डॉ. वैशाली तातोबा चौगुले | 293 |
| 99 | साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरीतील शिक्षण | डॉ. गिरीश मोरे | 296 |
| 100 | आचार्य विनोबा भावे यांचे शिक्षणविचार | डॉ.महेश नारायण गायकवाड | 299 |

# माझी काटेमुंढरीची शाळा ; शिक्षणाचे अधिक उण्या स्वरूपाचे एक चित्र

विपिन नारायण वैराट
शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली
मोबा. ९२०९३००३९५

साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. तिथले प्रश्न, निसर्ग, संस्कृती या सगळ्यांचा परिणाम हा त्या त्या साहित्यावर होत असतो. समाजातील बदलानुसार साहित्यात ही बदल होताना दिसतो. एवढेच नव्हे तर, समाजाशी जशी गरज असेल तसे साहित्य आकाराला येते, जसे की, लढण्याची प्रेरणा देण्यासाठी पोवाडा जन्मला, तर श्रम परिहारासाठी लावणी जन्माला आली. म. फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड हाती घेतला ते समाजाचे अतीव दुःख पाहून, तर संयुक्त महाराष्ट्रासाठी अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरीचे रुप बदलले. एकूणच समाजातील राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक घडामोडींचा प्रभाव साहित्यावर पडताना दिसतो. तसे पडणे अपेक्षीत सुद्धा आहे. कारण केवळ मनोरंजनासाठी निर्माण झालेले साहित्य दिर्घकाळ टिकत नाही. राष्ट्रप्रेमाने, समाजप्रेमाने भारावलेले साहित्य समाज जवळ करतो. सामाजिक प्रश्नांची, राष्ट्रीय प्रश्नांची जाणीव असलेल्या साहित्याला जनमानसात किंमत असते. हेच साहित्य समाजाला वळण लावण्याचे काम करीत असते, दिशा देण्याचे काम करत असते. ह्या न्यायाने आज साहित्यात शिक्षण विषयक प्रश्नांची, शिक्षणाच्या सद्यस्थितीची, प्रगतीची वाटचाल कितपत आहे ? हे जाणणे महत्त्वाचे ठरते .

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. मनुष्याच्या समूहाने समाज बनतो. मानवाने आपल्या रक्षणासाठी समूह निर्माण केले. समूह व्यक्तीचे रक्षण करु लागला. ज्या मानवाने समाजाची निर्मिती केली त्या समाजाचे मानवावर नियंत्रण आले तसे मानवाचेही त्या समाजावर नियंत्रण येवू लागले. एकमेकांना ते घडवू लागले. हे दोन्ही घटक परस्परावलंबी होतं. माणूस प्रगत होत गेला तसा समाजही प्रगत होत गेला. त्यानुसार विविध सामाजिक संस्थांची निर्मिती होत गेली. राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक संस्था निर्माण झाल्या. त्याद्वारे विकास घडवून आणण्यासाठी प्रारंभी अनौपचारिक शिक्षण सुरु झाले तर नंतर औपचारिक शिक्षणाची गरज निर्माण झाली. या प्रक्रियेत शिकणारा व शिकविणारा असे स्वरुप प्राप्त झाले. ह्या प्रक्रियेतून पुढे शिक्षण व्यवस्था निर्माण झाल्या. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्त्वाचा अविष्कार.'१ त्याप्रमाणे विद्यार्थ्यांमधील अपूर्णत्त्वाला आकार देण्यासाठी संस्था कार्य करीत राहिल्या. ह्या संस्था समाजरचनेतील पायाभूत आणि मुख्य संस्था म्हणून मान्यता पावू लागल्या. राष्ट्राच्या, समाजाच्या प्रगतीमध्ये यांचे योगदान महत्त्वाचे ठरते आहे. ह्या शिक्षणव्यवस्थेच्या विकासावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष समाजाची प्रगती प्रभावीत होत आहे. ''नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा संस्कार करणे, विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविणे, त्यांना सद्वर्तनी बनविणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे. शील संवर्धन व चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण असले पाहीजे. आजच्या विज्ञान युगात भौतिकवादाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी तसेच व्यक्तीच्या सामाजिक व नैतिक विकासासाठी मूल्यांची गरज आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचा समतोल विकास साधला जातो.''२ साहजिकच ज्या साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडते असे आपण म्हणतो, त्या साहित्यात ह्या शिक्षण व्यवस्थेचे, त्या अनुशंगाने अविरतपणे चालू असलेल्या शिक्षण प्रक्रियेचे, त्याद्वारे साधला गेलेल्या व्यक्तिच्या समतोल विकासाचे प्रतिबिंब साहित्यात पडणे अपरिहार्य आहे. मराठी साहित्यात असे प्रतिबिंब पडलेले जाणवते.

आज मराठी साहित्यात शिक्षणाचे अधिक-उण्या स्वरुपाचे चित्र रेखाटण्याचे काम मोजक्या पण नेमक्या पद्धतीने चालू आहे. शिक्षण प्रक्रिया प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावर पार पडते. प्रत्येक स्तरानुसार त्यांचे प्रश्न, स्वरुप कमी अधिक प्रमाणात बदलताना दिसते. ओघाने त्यांचे निराकरणही त्या त्या स्तरावर करणे गरजेचे आहे. त्याचे परिणाम त्यातील प्रश्न काही प्रमाणात सामायिक आहेत. पुन्हा त्यामध्ये परिसरानुसार ग्रामीण, शहरी, आदिवासी भागानुसार विविधता आणि फरक जाणवतो. ह्या सगळ्याचे चित्रण आज मराठी साहित्यात होत आहे. कथा, कादंबऱ्या, काव्यांतून शिक्षणाचं उणं-अधिक स्वरुपाचे चित्र आकार घेत आहे. त्या त्या कालखंडाचा परिणामही साहित्यात जाणवताना दिसतो आहे. व्यंकटेश माडगूळकरांची बनगरवाडी, भालचंद्र नेमाडेंची कोसला, ह. मो. मराठेंची निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी, भाऊ गावडेंचे उंबरठ्यावरचे दिवस, शाळा आहे-शिक्षण नाही हेरंब कुलकर्णींचे, सुशील धसकटेंचे जोहार आणि माझी काटेमुंढरीची शाळा, गो. ना. मुनघाटे त्याचबरोबर काही अनुवादीत साहित्य जसे की शोभा भागवत यांचे शिक्षण आणि शांती जेनसाही, अरुण ठाकूर यांनी अनुवादीत केलेले 'टीचर' इत्यादी साहित्यातून

शिक्षण व्यवस्था, त्यातील गुण–दोष, त्याचे परिणाम चित्रित झालेले आहे. समाज – शिक्षक – विद्यार्थी यांचे नातेसंबंध प्रकट करणारे विषय साहित्यात उमटत आहेत. अनेक संदर्भान्वये विषयांचा उहापोह साहित्याच्या अनुशंगाने होत आहे.

माझे काटेमुंढरीची शाळा ह्या गोविंद नारायण मनुघाटे यांच्या आत्मकथनात्मक कांदबरीमध्ये आदिवासी शिक्षणाच्या व्यथा वेदना मांडल्या आहेत. ही कांदबरी मादिया गोंड या आदिवासींच्या प्रांतातील शिक्षणावर आधारित आहे. शिक्षणा संर्दभातील प्रश्नांची जाणीव आणि त्या प्रश्नांची उत्तरे देखील देणारी ही कांदबरी. गो.ना.मनुघाटे ह्या कांदबरीचे लेखक गडचिरोली जिल्हयातील एक ध्येयवादी शिक्षक होत. त्यांच्या आदिवासी शिक्षण चळवळीतील अनुभवाच्या जोरावर त्यांनी कांदबरीत व्यथा, वेदनांबरोबर ध्येयवादी शिक्षकाचे चित्र वाचकांपुढे उभे केले आहे.

'माझे काटेमुंढरीची शाळा' ह्या कादंबरीचे कथानक थोडक्यात असे ..... प्रारंभच कादंबरीचा जिल्हा परिषदेच्या एका शाळा मास्तरच्या नियुक्तीने होतो. तालुक्या पासून पन्नास मैल लांब असलेला गाव. गावात एस.टी.जात नाही. दरवर्षी एखादा तरी नरबळी. आधीच्या शिक्षकाचा खून झाल्याची वार्ता गुरूजींना गावात शिरतानाच कळते. शिक्षक म्हणून त्या खेड्यात रूजू होण्यापासून निवृत्तीपर्यंतच्या काळाचे कथानक कादंबरीत येते. कोणतीही भौतिक सुविधा नसताना अज्ञान, दारिद्र्याने पिचलेल्या दुर्गम आदिवासी खेड्यात आदिवासी मुलांना आईची माया लावून शाळेची गोडी लावताना, शाळा बाह्य मुल होऊ नये म्हणून उपाय करतात. अंगावर कपडा नसला तरी नुसत्या लंगोटवर शाळेत येऊ देतात. शाळेतील मुलांच्या लहानग्यांची सांभाळण्याची सोय गुरुजी करतात. त्यांच्यात प्राणी मात्रांबद्दल प्रेम निर्माण करतात. पर्यावरणाविषयी जाणीव निर्माण करतात. मुलांशी एकरूप होतात. केवळ विद्यार्थीतत्त्व नव्हे तर आदिवासींच्या कुटुंबातील एक सदस्य ह्या नात्याने गावाच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडतात. मुलांबरोबर लोकांना साक्षर करतात. शाळेची नवी इमारत उभी करतात. जिथं मास्तर नावाच्या प्राण्याला गाव घाबरत असते तिथे शिक्षणाचा प्रयोग यशस्वी करतात. त्यांचा लाडका विद्यार्थी शिदू पुढे त्या शाळेचा मुख्याध्यापक होतो. त्याच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल त्याला राष्ट्रपती पारितोषिक दिले जाते. या शिदूच्या गौरवाने गुरुजींना आपली आयुष्यभराची सेवा धन्य झाली असे वाटते.

माझी काटेमुंढरीची शाळा ह्या कादंबरीत शिक्षणापासून वंचित असलेले माडिया गोंड आदिवासी विद्यार्थी त्या मुलांना शिक्षण मिळावे, त्यांची उपस्थिती वाढावी म्हणून केले गेलेले गुरुजींकरवीचे प्रयोग, त्याला विद्यार्थी व तिथल्या आदिवासींचा मिळालेला प्रतिसाद, त्यांची संस्कृती अशा एक ना अनेक गोष्टी शब्दबद्ध होतात. गो.ना.मुनघाटे यांनी प्रस्तूत चित्रण करीत असताना ध्येयवादी गुरुजी, आदर्श विद्यार्थी शिदू, नागोसे गुरुजी यांचेही उत्कट चित्रण केले आहे. अशा व्यक्तिरेखांमधून कांदबरीत शिक्षणाचे अधिकतम उणं स्वरूपाचे चित्र उभे राहिले आहे. कादंबरीत कथानायकाच्या रूपाने शिक्षणव्यवस्थेचा जो केंद्रबिंदू शिक्षक असतो त्याविषयांचे आशावादी चित्र उभे केले आहे. सामाजिक बांधिलकीतून काम करणारा हा गुरूजी वाचकांच्या मनाला भिडतो. कारण तो मनामनात दडलेल्या त्या जुन्या काळाच्या पिढीच्या गुरुजींचा प्रतिनिधी आहे. वाचकांना बालपणीचा गुरुजी या गुरुजींमध्ये भेटतो. ''शिक्षकामध्ये समाज परिवर्तनाचे सामर्थ्य आहे. नवी पिढी घडविण्याची ताकद आहे. तो समाज प्रबोधन करू शकतो, तो सामाजिक अभियंता, समाजातील सर्वच प्रश्न नियम बनविण्याने कायद्याने सुटत नाहीत. त्यासाठी शैक्षणिक प्रबोधन गरजेचे आहे व त्यात शिक्षणाची सर्वात महत्वाची भूमिका आहे, असायला हवी. त्यादृष्टीने शिक्षकाने समाजाची बांधिलकी मानावी, समाज आधुनिक प्रगत करावा.''३ हे समाज परिवर्तनाचे आपल्या मधील सामर्थ्य काटेमुंढरीतील गुरुजींनी ओळखून, सामाजिक बांधिलकी मानून विद्यार्थ्यांसाठी सतत झटत राहिले. ''ही नोकरी पोटासाठी स्विकारत असलो तरी अध्यापन हा माझा धर्म आहे, असे तत्वज्ञान घेऊन जगतात. गावात भौतिक सुविधांची वाणवा असूनही तिथल्या मातीशी, संस्कृतीशी, आदिवासींशी गुरुजी एकरूप होतात. गुरुजी पहिला पगार घेऊन काटेमुंढरीला येतात त्यावेळी माझ्या ह्या विद्यार्थ्यांपुढे पैशाच्या हिशोबात मोजला जाणारा पगार फार फिका वाटतो. असे म्हणतात, आपले कुटुंब, मुलबाळ, शहरात असलेल्या घरादाराचा विसर ह्या जंगलात व्हावा हे कोडं त्यांना उमगत नाही. पुढे गुरुजी 'मरणदेखील याच मातीत यावं' अशी इच्छा व्यक्त करतात. कादंबरीत उभा केलेला हा गुरुजी समस्त समाजाच्या डोळ्यात अंजन घालतो. आजही वाडी– वस्तीवर असंख्य बिनचेहऱ्याचे गुरुजी आपणास भेटतील. जे खांद्यावर राष्ट्राची धुरा घेऊन, कुठल्याही प्रसिद्धी शिवाय पिढ्यान्‌पिढ्या आपली सेवा राष्ट्राला समर्पित करीत आहेत. याचे प्रतिनिधित्व कादंबरीतील गुरुजी करतात. ज्या परिसरात गुरुजी काम करतात त्या परिसराविषयी, तिथल्या लोकांविषयी एक अनामिक नातं, प्रेम निर्माण करतात. तिथल्या आठवणी कायम ते आपल्या हृदयात ठेवतात. आपलीही आठवण गावात राहावी असे त्यांना वाटत असते. म्हणून 'बनगरवाडी' या कादंबरीतील गुरुजी ''तालीम बांधावी पोरांना खेळण्यासाठी वेळप्रसंगी गावकऱ्यांना एकत्र येऊन बसण्यासाठी प्रशस्त अशी तालमीची इमारत बांधावी.... या गावात मी शाळा मास्तर होतो याची आठवणही राहील. ''४ बनगरवाडीतील गुरुजींची ही गावा विषयीची आस्था काटेमुंढरीतील गुरुजींच्या आस्थेविषयी एकरूपता, साम्य दाखविते. आजच्या काळात केवळ भौतिक गोष्टींचा विचार केला जातो. व्यावहारिक

व्यवस्थेमध्ये चांगल्या अर्थाने परिवर्तन घडले पाहीजे. मला वाटते साहित्यिक आणि साहित्यामध्ये ते परिवर्तनाचे सामर्थ्य आहे. ते सामर्थ्य दाखवण्याची आज वेळ आली आहे एवढेच सत्य शेवटी मांडणे देश हिताचे ठरेल.

**संदर्भ :**


१) प्राचार्य रा. तु. भगत, शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, तृतीयावृत्ती २००९, पृ. १२.

२) डॉ. सुरेश करंदीकर, मीना मंगरुळकर, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२,पृ. ४९.

३) संपा. हरिश बुटले – पालक (मासिक), पुणे, सप्टें. २००८, पृ. २८ (प्राचार्य मुकुंद आंधळकर – समाजपरिवर्तनाचे सामर्थ्य).

४) व्यंकटेश माडगूळकर, बनगरवाडी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, २३ वी आवृत्ती, ऑगस्ट २०१०, पृ. ७४.

५) पालक, उनि, पृ. ५१ – प्रमिला आहेरे, हाच खरा शिक्षकधर्म.

६) गो. ना. मुनघाटे, माझी काटेमुंढरीची शाळा, साधना प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, मार्च २०१२, पृ. ७८, ८०,८९.


■ ■ ■

दृष्टीकोन जोपासला जातो. तिथे आजही गुरुजी आपण काम केलेल्या प्रत्येक भागाशी, शाळेशी भावनिक नाते जोडतो ते कायम ठेवतो. मराठी साहित्याने ह्या गोष्टींची ठळक नोंद घेतली आहे. हेच कादंबरीच्या माध्यमातून स्पष्ट होते. गुरुजी आजसुद्धा श्रद्धास्थान आहे. शिक्षकाच्या एका कार्यकाळात त्याच्या हाताखालून किमान दोन पिढ्या तरी तयार होतात. आजचा विद्यार्थीही उद्याचा नागरिक असतो. या न्यायाने नागरिकांची जडण-घडण पर्यायाने राष्ट्राची जडण-घडण शिक्षकच करीत असतो. तो राष्ट्राच्या भविष्याचा शिल्पकार असतो. असा शिल्पकार रेखाटण्याचे काम गो.ना. मुनघाटे यांनी गुरुजींच्या रूपाने आपल्या कादंबरीत केले आहे.

कादंबरीच्या अखेरीस नागोशे गुरुजींच्या रूपाने एका आणखी आदर्श शिक्षकाची ओळख होते. गुरुजींच्या आदर्शाच्या साऱ्या संकल्पना, त्याचे रूप म्हणजे नागोशे गुरुजी. आदिवासी भागातील अत्यंत दुर्गम अशा खेड्यात गढ्ठेवाहींच्या शाळेत शिक्षक होते. तिन्ही वर्गाला एकच एक शिक्षक. पण अभ्यास कोणत्याच वर्गाचा मागे नाही. कारण मुलांसाठी झटणारे साधी राहणीमान, निर्व्यसनी. मुलं गैरहजर दिसली की घरोघरी फिरून गोळा करीत. केवळ वर्गातल्या अभ्यासात नाहीतर क्रीडा क्षेत्रातही त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले. मैदानावर जखमी विद्यार्थी असो, शिक्षक असो मदत करायला सर्वात पुढे. रेफरीशिप प्रामाणिकपणे करीत. क्रीडा संमेलनाच्या गावी मोडक्या तोडक्या पडवीत विनातक्रार आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन राहत. मूल झोपवून नंतर स्वतः झोपत, रात्री एकदा दोनदा तरी मुलांसाठी उठत. आई वडील जी सेवा करायला कंटाळतील ती सेवा नागोसेगुरुजी आपल्या मुला-मुलींची करीत. फळाची अपेक्षा न करता कर्म करीत राहीले. गो.ना. मुनघाटे यांनी नागोसे गुरुजीची व्यक्तिरेखा रेखाटून समाजाला अपेक्षीत आदर्श गुरुजी उभा केला आहे. ''सुजाण नागरिक, सुसंस्कृत व्यक्तिमत्व घडवण्याचे आपल्या देशात तरी एकच केंद्र आहे ते म्हणजे 'शाळा'. या 'शाळा' म्हणजे नुसत्या निर्जीव भिंतीची इमारत नव्हे. या शाळांना निवांतपणा, आधुनिकपणा, दूरदृष्टी, परिवर्तनाच्या वाटेवर आणण्याचे काम शिक्षक करत असतो''५. नागोसे गुरुजींच्या रूपाने तो साहित्यात चित्रित झाला आहे. शिक्षकाचा खरा धर्म पाळणारा शिक्षक आणि त्याच्यावरील असलेला समाजाचा विश्वास त्यामुळेच संवर्धित होताना दिसतो. आजही विद्यार्थी आई-वडिलांनंतर शिक्षकांना प्रथम स्थान देतो. त्यांना दैवत मानतो. याचे कारण नागोसे गुरुजी सारखे गुरुजी समाजामध्ये ध्येयाने झपाटून आपली कर्तव्य पार पाडतात. कादंबरीचा कृतार्थ बिंदू म्हणजे काटेमुंढरीच्या गुरुजींचा आदर्श विद्यार्थी शिदू त्याच शाळेचा मुख्याध्यापक होतो. शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल त्याला राष्ट्रपती पारितोषिक घोषित होते हे सारे गुरुजींच्या तपश्चर्येचे फळ असते. समाजामध्ये जेथे जेथे असा शिक्षक लाभला आहे, तिथे तिथे पिढी घडलेली आहे, घडताना दिसणार आहे. हे सृजनात्मक वास्तवसुद्धा कादंबरीच्या रूपाने प्रकट होते. अनेक कारणांनी गुरुजींची लोकमानसातील आदरयुक्त प्रतिमा पुसट होत चालली आहे. ती काटेमुंढरीच्या गुरुजींमुळे पुन्हा गडद होऊ पाहते आहे असे म्हणावे लागेल.

'माझी काटेमुंढरीची शाळा'मध्ये केवळ शिक्षकी पेशाचे उदात्तीकरण न करता काही वास्तव सुद्धा परखडपणे मांडले आहे. शिक्षकीपेशा आणि शिक्षण व्यवस्था यांच्या संदर्भात होत चाललेल्या मूल्यांचे अधःपतन मुनगाटे कादंबरीत टिपतात. हे करीत असताना मुनघाटे गुरुजींनी कादंबरीतील गुरुजींच्या तोंडीच व्यवस्थेचं वास्तव मांडून खेद व्यक्त केला आहे. ''आज पोटार्थी शिक्षकांची फौज निर्माण झाली आहे. आता शंभरात चार-दोन निष्ठावंत शिक्षक दिसतात''६ असे सांगतात. बिटेवाडीच्या शिक्षक खुशाल हिवसेच्या रूपाने अनैतिक गोष्टींचे भयाण वास्तव कादंबरीत येते. अशा शिक्षकांवर कारवाईही करता येत नाही. कारण लोकशाही. प्रायव्हेट मामल्यात सरकारला सुद्धा कारवाई करता येत नाही. वर्गात धूम्रपान करणे, नोकरी बरोबर जोडधंदा करणे, काही शाळा बारमाहीबंद, तेथे जुगार अड्डा, खाजगी ट्यूशन घेणे, ट्यूशनला गर्दी तर वर्ग ओस. ग्रंथालयात वेळ घालवण्याऐवजी बारमध्ये वेळ घालवणारा शिक्षक अशा एक ना अनेक गोष्टींचे, शिक्षण व्यवस्थेतील अधःपतनाचे चित्र मुनघाटे गुरुजी आपल्या कादंबरीत रेखाटतात. मात्र देशाच्या भावी पिढ्यांसाठी आपल्या वैयक्तिक सुखाची राखरांगोळी करणाऱ्या, साऱ्या शिक्षणक्षेत्राला ज्याचा अभिमान वाटेल अशा नागोसे गुरुजींसाठी कथानायक नतमस्तक होतात.

आजही मराठी साहित्यामध्ये शिक्षणासंदर्भातील असंख्य पैलू अप्रकाशित राहिले आहेत. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारा शिक्षक पण आज त्याच्या अवती भोवती अनेक प्रश्न या व्यवस्थेत निर्माण झाले आहेत. डी.एड, बी.एड सारखे कोर्स, सेट नेट सारख्या परीक्षा पास होऊन नोकऱ्या नाहीत. नोकरीला लागायचे तर संस्था चालकांच्या 'डिमांड'. गुणवत्ता असून हंगामी नियुक्ती. ज्या गुरू विषयी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे त्यालाच आज 'कृतज्ञता निधी' देण्याची वेळे येत आहे. हे सगळे कमी म्हणून नोकरी करीत असताना वशिलेबाजी, गटतट, सामाजिक, राजकिय दबाव यांना सामोरे जाऊन सेवा देणे भाग पडते. पुन्हा शाळा बाह्य कामे आहेतच. ह्या साऱ्या व्यथा वेदनांना न्याय मराठी साहित्याने देणे अपेक्षीत आहे. काही प्रमाणात प्रस्तुत गोष्टींचे चित्रण साहित्यात आले आहे. पण जोरकसपणे हे चित्रण आले पाहिजे. समाजाला, शासनाला शिक्षण व्यवस्थेतील ह्या प्रश्नांबाबत लक्ष घालण्यास भाग पाडले पाहिजे.